# दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली

**दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली यांच्या शनिवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त :**

दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली यांची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी १० वाजता हॉटेल शिवम, प्लॉट नं. पी-१४, एल. आय.सी. ऑफिस जवळ, आर. आर. हॉस्पिटलच्या मागे, एम. आय. डी. सी., डोंबिवली ( पूर्व) येथे संपन्न झाली. या सभेस एकूण १७३ सभासद उपस्थित होते. आवश्यक गणपूर्ती न झाल्यामुळे सभा तहकुब करुन नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने म्हणजे सकाळी ठिक १०.३० वाजता सुरु करण्यात आली. सभेचे अध्यक्षपद बँकेचे अध्यक्ष, माननीय श्री. रमेश रतन पाटील यांनी भूषविले.

तद्नंतर सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी सभेच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापुर्वी अहवाल वर्षात बँकेचे जे सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक तसेच, राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रिडा या व अशा अन्य क्षेत्रांतील ज्या विभूती पंचतत्वात विलिन झाल्या आहेत अशा सर्वांस श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन सभेस केले. सर्व उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून निधन पावलेल्यांच्या आत्म्यांस सद्‌गती व चिरशांती लाभो अशी इश्वर चरणी प्रार्थना करुन, त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

बँकेच्या कर्मचारी, सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व बँकेच्या प्रथेनुसार बँकेचे ज्येष्ठ सभासद, श्री. राघवेंद्र हनुमंतराव जोहरापुरकर यांना बँकेचे आद्य संस्थापक, कैलासवासी श्री. दत्तात्रय माधवराव मुनशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन, श्रीलक्ष्मीच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करण्याची विनंती केली.

तद्नंतर विषय पत्रिकेनूसार सभा सुरु होण्यापुर्वी सभासदांनी कार्यालयाकडे अर्ज केल्यानूसार इयत्ता १० वी, १२ वी, पदवी आणि पदव्युत्तर परिक्षांमधे तसेच, क्रिडा क्षेत्रात उज्ज्वल कामगिरी केलेल्या पाल्यांचा संचालक मंडळातर्फे बँकेचे सन्मानचिन्ह, रोख पारितोषिक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी बँकेचे माननीय अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांना अध्यक्षीय भाषण करण्याची विनंती केली.

सर्वप्रथम माननीय अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांनी उपस्थित सर्व सभासद बंधु-भगिनींचे व व्यासपीठावरील सर्व मान्यवर संचालकांचे बँकेच्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमधे हार्दिक स्वागत केले. तद्नंतर त्यांनी माहिती दिली की, मागील दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठरावान्वये सन २०२३-२०२४ या कालावधीकरिता बँकेचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउंटंट्स यांची नेमणूक करण्यात आली होती. वैधानिक लेखापरिक्षकांनी त्यांचा अहवाल बँकेस व माननीय सहकार आयुक्त व निबंधक यांच्या कार्यालयात सादर केल्यामुळे सदर सभा आयोजित करण्यात आली.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

२..

तद्नंतर त्यांनी सन २०२३-२०२४ या कालावधिसाठीचा बँकेचा ४९ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्यावतीने सभासदांसमोर सादर केले. अहवाल वर्षी आपल्या बँकेस वैधानिक लेखापरिक्षकांनी " अ " वर्ग दिला असल्याची माहिती त्यांनी सभेस दिली. सभासदांना ८ टक्के दराने लाभांश वितरित करण्याची शिफारस संचालक मंडळाने सभेस केली आहे असे सांगीतले.

दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेर कामकाजाचा संक्षिप्त आढावा सभेसमोर मांडतांना त्यांनी विदीत केले की, बँकेच्या ठेवी रु. ५१४.२२ कोटी, कर्जव्यवहार रु. ३०७.५९ कोटी, असून बँकेस अहवाल वर्ष अखेर रु. २.७० कोटी एवढा निव्वळ नफा झाला आहे.

तद्नंतर त्यांनी असे विदित केले की आपल्या बँकेची नांदीवली शाखा जी भाडे तत्वावर आहे त्याच्या भाड्या पोटी मोठी रक्कम प्रती वर्षी खर्ची पडत आहे त्या अनुषंगाने नांदीवली शाखा हि स्व:मालकीच्या जागेत स्थलांतरीत करण्यासाठी संचालक मंडळ विचाराधिन आहे.

सभा अध्यक्षांनी नमूद केले की, फेब्रुवारी, २०२५ पासुन बँक ५० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यासाठी बँक सभासदांकरीता विवीध उपक्रम राबविणार आहे. बँकेच्या ४९ व्या अहवालात सन २०२४-२०२५ चे नफा-तोटा अंदाज पत्रक दिले आहे त्यानूसार बँकेचा निव्वळ नफा होण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. या सभेला उपस्थित राहिल्याकरिता त्यांनी सभासदांचे पुन्हा आभार मानले व सभेच्या विषयपत्रिकेनुसार सभेचे कामकाज होईल असे नमूद केले.

तद्नंतर विषयपत्रिकेनूसार सभेस सुरुवात करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी उपस्थित सर्व सभासदांचे ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वागत करुन, सभेची विषयपत्रिका व सूचना सभेसमोर वाचून दाखविली.

**विषय क्र. १. दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

विषयाच्या सुरवातीस मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या बँकेच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या छायांकित प्रती बँकेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमधे व बँकेच्या वेबसाईटवर सभासदांकरिता उपलब्ध करुन दिल्या असल्याची माहिती देऊन सदर इतिवृत्ताचे वाचन करण्याकरिता श्री. चंद्रशेखर गो. जोशी सहाय्यक सरव्यवस्थापक यांना पाचारण केले. सदरहू सभेतील निर्णयांचा / सूचनांचा पुर्तता अहवाल व केलेल्या कार्यवाहीची संक्षिप्त माहिती दिल्यानंतर श्री. चंद्रशेखर गो. जोशी सहाय्यक सरव्यवस्थापक यांनी या इतिवृत्तांस मंजूरी देण्याची विनंती सभेस केली. याविषयी सविस्तर चर्चा होऊन पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. १.** ठराव करण्यात येतो की, दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या बँकेच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

सुचक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र.२३०६७)
अनुमोदक : श्री. आनंद लक्ष्मण डीचोलकर (स.क्र.१०६५६७)

**ठराव एकमताने मंजूर.**

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

**विषय क्र. २. दिनांक ३१.०३.२०२४ अखेरच्या वर्षाचा, बँकेच्या कामकाजाचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.**

श्री. सुरेश मोहन शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, बँकेचे अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांनी त्यांच्या अध्यक्षीय मनोगतात माननीय संचालक मंडळाचा अहवाल सभेसमोर सादर केला आहे. तसेच, कोणाही सभासदांचे हिशेबासंबंधी किंवा अन्य संदर्भातील माहिती अथवा सूचनांची पत्रे कार्यालयास प्राप्त झालेली नाहीत. यावर सविस्तर चर्चा होऊन पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. २.** ठराव करण्यात येतो की, वर्ष २०२३-२४ या कालावधीचा माननीय संचालक मंडळाचा बँकेच्या कामकाजाबद्दलचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अहवाल व त्यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा - तोटा पत्रकांस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. अनंत नामदेव अगावने (स.क्र.११३००८)
अनुमोदक : श्री. अरुण महादेव सावंत (स.क्र. ११३८९८)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ३. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी माननीय संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा विभागणीस मंजूरी देणे.**

मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी माहिती दिली की, यांनी सन २०२३-२०२४ साठी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ६५ अन्वये सर्व तरतूदी केल्यानंतर बँकेस अहवाल वर्षी रु. २,७०,०५,४७९.८५ एवढा नफा झाला आहे. सदरहू नफा रकमेत मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. ६,४३८.४७ जमा केल्यास अहवाल वर्ष अखेर एकूण नफा रु. २,७०,११,९१८.३२ हा निव्वळ नफा विनियोगाकरिता उपलब्ध असल्याची माहिती दिली.

संचालक मंडळाने पुढील प्रमाणे नफा वाटणीची शिफारस केली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत करुन त्यास मान्यता देण्याची विनंती त्यांनी सभासदांस केली.

| | | |
|---|---|---|
| वैधानिक राखीव निधी | रु. | ६७,५५,०००.०० |
| गुंतवणूक चढ-उतार राखीव निधी | रु. | ५,००,०००.०० |
| लाभांश @ ८ % ( हिस्से राशी दराने ) | रु. | १,१२,००,०००.०० |
| संशयीत व बुडीत कर्ज निधी | रु. | २०,००,०००.०० |
| ईमारत निधी | रु. | ५०,००,०००.०० |
| तंत्रज्ञान विकास निधी | रु. | १०,००,०००.०० |
| सुवर्ण महोत्सवी निधी | रु. | ५,५०,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ६,९१८.३२ |
| **एकूण** | रु. | २,७०,११,९१८.३२ |

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

तद्नंतर श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी प्रश्न विचारला कि ग्रॅज्युईटीची रु. ७०.०० लाखाची तरतूद का आहे ? व ती कशा करिता केली आहे? यावर उत्तर देतांना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी माहीती दिली की बँक दरवर्षी ग्रॅज्युईटीची तरतूद करते. त्या प्रमाणे एल. आय.सी. ला दरवर्षी बँक टप्प्या टप्प्याने देय रक्कम भरणा करते. त्या प्रमाणे या आर्थिक वर्षात बँकेने ग्रॅज्युईटीची तरतूद केली आहे. त्यातील तुट या यावर्षी रु. ७०.०० लाखाने असुन ती या अहवालात दर्शवीली आहे. या विषयावर सविस्तर चर्चा झाली व खालील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ३.** ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ६५ अन्वये आवश्यक तरतूदी केल्यानंतर संचालक मंडळाने पुढील तपशिलाप्रमाणे शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| वैधानिक राखीव निधी | रु. | ६७,५५,०००.०० |
| गुंतवणूक चढ-उतार राखीव निधी | रु. | ५,००,०००.०० |
| लाभांश @ ८ % ( हिस्से राशी दराने ) | रु. | १,१२,००,०००.०० |
| संशयीत व बुडीत कर्ज निधी | रु. | २०,००,०००.०० |
| ईमारत निधी | रु. | ५०,००,०००.०० |
| तंत्रज्ञान विकास निधी | रु. | १०,००,०००.०० |
| सुवर्ण महोत्सवी निधी | रु. | ५,५०,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ६,९१८.३२ |
| **एकूण** | रु. | २,७०,११,९१८.३२ |

सूचक : श्री. तुकाराम प्रल्हाद नेहते (स.क्र.५२२८)
अनुमोदक : श्री. युवराज जावळे (स.क्र. ६४०४१)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ४. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावर चर्चा करणे व स्विकृत करणे.**

विषयाच्या सुरुवातीस माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. एस. व्ही. ए. बी. अॅन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी सन २०२३-२४ चे बँकेच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा गोषवारा, श्री. नविनचंद्र पुरुषोत्तम मेहता, व्यवस्थापक (लेखा परीक्षण विभाग ) यांनी सभेसमोर वाचून दाखविला. यांनी माहिती दिली की, यावर्षी बँकेस वैधानिक लेखापरिक्षकांनी " अ " वर्ग दिलेला आहे. कार्यालय सदरहू लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल विहित कालावधीमधे तयार करेल व तो आवश्यक विभागांकडे पाठविला जाईल.

सदरहू विषयावर सविस्तर चर्चा झाली व पुढील ठराव पारीत करण्यात आला.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

**ठराव क्र. ४.** ठराव करण्यात येतो की, माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल स्विकृत करण्यात येत आहे.

सूचक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र. २३०६७)

अनुमोदक : श्री. आकाश कृष्णा गायकवाड (स.क्र.१०८०२८)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ५. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

विषयाच्या सुरुवातीस सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा साठी वैधानिक लेखापरिक्षक, मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाचा गोषवारा श्री. नविनचंद्र पुरुषोत्तम मेहता, व्यवस्थापक (लेखा परीक्षण विभाग ) यांनी सभेसमोर वाचून दाखविला. सदरहू वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत मंजूर केला होता. दोष दुरुस्ती / पूर्तता अहवाल लेखापरिक्षकांनी तपासून दिनांक ७ सप्टेंबर, २०२३ रोजी स्विकृत केल्यावर सदरहू दोष दुरुस्ती / पूर्तता अहवाल माननीय सहकार आयुक्त, पुणे व संबंधित कार्यालयाकडे सादर करण्यात आल्याची माहिती सभेस देण्यात आली. अशा प्रकारे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा होऊन तो स्विकृत करण्यात आला.

**ठराव क्र. ५.** ठराव करण्यात येतो की, माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी केलेल्या बँकेच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवालाची नोंद हि सभा घेत आहे.

सूचक : श्री. आनंद लक्ष्मण डीचोलकर (स.क्र.१०६५६७)

अनुमोदक : श्री. अरुण महादेव सावंत (स.क्र. ११३८९८)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ६. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे (रिझर्व बँकेच्या मंजुरीस अधीन राहून).**

विषयानुषंगाने श्री. सुरेश मोहन शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहकार आयुक्त कार्यालयाने सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी तयार केलेल्या लेखापरिक्षकांच्या शासनमान्य नामतालिकेमधून आपल्या बँकेकरिता सन २०२४-२०२५ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून पुनर्नियुक्ती करणेसंदर्भात मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या कार्यालयात अर्ज केल्याची माहिती सभेस दिली. त्यांनी सर्वसाधारण सभेस विनंती केली की, या कलम ८१ नूसार आपल्या बँकेच्या सन २०२४-२०२५ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून रिझर्व बँकेच्या मंजुरीस अधिन राहुन मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांची पुनर्नियुक्ती करण्याचा निर्णय घ्यावा. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणुक करण्याचे अधिकार व त्याच प्रमाणे त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देण्याचे ठरविण्यात आले व खालील ठराव पारीत करण्यात आला.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

**ठराव क्र. ६**. ठराव करण्यात येतो की, संचालक मंडळास दिलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने बँकेचे सन २०२४-२०२५ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांना रिझर्व बँकेच्या मंजुरीस अधिन राहुन पुनर्नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. पुढे असाही ठराव करण्यात येतो की, त्यांना माननीय सहकार खात्याच्या परिपत्रकानूसार वैधानिक लेखापरिक्षणाचा मेहनताना देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक : श्री. अनंत नामदेव अगावने (स.क्र.११३००८)
अनुमोदक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र. २३०६७)
**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ७. सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

श्री. सुरेश मोहन शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बँकेच्या सन २०२४-२०२५ करिता नफा-तोट्यासंबंधीचे अंदाज पत्रक सभेसमोर सादर केले व अंदाज पत्रकाप्रमाणे आपल्या बँकेची वाटचाल चालू असून, वर्ष अखेर अंदाजपत्रकामधे नमूद केल्याप्रमाणे बँकेच्या ठेवी, कर्जव्यवहार व नफा होईल असा विश्वास व्यक्त केला.

**विषय क्र. ८. माननीय अध्यक्षांच्या संमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.**

विषयाच्या सुरुवातीस बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. दिलीप मथुरादास भोईर यांना त्यांनी राष्ट्रीय स्विमींग स्पर्धेत यश मिळविल्या बद्दल त्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच मा. संचालक श्री. पवन मुकुंद भोईर यांनी आंतरराष्ट्रीय जिम्नॉस्टीक्स स्पर्धेत पंच म्हणुन कामगीरी पार पाडल्यामुळे त्यांचा सुध्दा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

त्यानंतर श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी श्री डेंटल स्पेशालीटी हॉस्पीटल यांना दिलेले कर्ज व त्यासंदर्भातील वसुली बाबत विचारणा केली. विषयानुषंगाने माहीती देतांना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी थकबाकीदारा विरोधात बँक करत असलेल्या कारवाईची माहीती दिली. त्यांनी पुढे विदित केलेकी सदरहू थकबाकीदारा विरोधात मुंबई हायकोर्ट व कलेक्टर यांनी श्री डेंटल स्पेशालीटी हॉस्पीटल यांच्या तारण मालमत्तेचा ताबा दिनांक २० ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्याचे आदेश बँकेस दिले आहेत. चर्चेत भाग घेतांना संचालक श्री. तुळशीराम विठ्ठल चौधरी यांनी सांगितले की सदरहु कोर्ट प्रकरणात ते स्वत: उपस्थित होते. तसेच संचालक श्री. संजय चौधरी व ॲड रोहीदास भंडारी यांनी बँकेची कार्यवाही योग्य दिशेने चालु आहे अशी माहीती सभेस दिली.

तद्नंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी, नांदिवली पंचानंद शाखेचे जागा भाडे व मालमत्ताकर या संदर्भात माहीती सभेस दिली. मा. अध्यक्ष श्री. रमेश रतन पाटील यांनी नांदिवली पंचानंद शाखा व्यावसायिक दृष्ट्या अधिक सुयोग्य व स्व:मालकीच्या जागेत स्थलांतरीत करणे प्रामुख्याने आवश्यक आहे असे विदीत केले. नांदिवली पंचानंद शाखे करिता गांधी नगर येथे मालकी तत्वावर जागा घेण्यासाठी सर्व साधारण सभेची मंजुरी आवश्यक असल्याचे नमुद केले. यासाठीचा प्रस्ताव सभेसमोर निर्णयास ठेवण्यात आला, यावर चर्चा होऊन पूढील ठराव पारीत करण्यात आला.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

**ठराव क्र. ७.** ठराव करण्यात येतो की, बँकेच्या नांदिवली पंचानंद शाखे करिता गांधी नगर येथे मालकी तत्वावर जागा खरेदी करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र. २३०६७)
अनुमोदक : श्री. अनंत नामदेव अगावने (स.क्र.११३००८)
**ठराव एकमताने मंजूर.**

तद्नंतर बँकेचे सभासद श्री. महादेव नरसिंग ढोकळे यांनी संचालक मंडळ व बँकेचा सर्व कर्मचारी वर्ग करिता असलेल्या कामाचे कौतूक केले. संचालक मंडळ अतीशय उत्तम रित्या काम करित असल्याने त्यांनी सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तद्नंतर सभासद श्री. राहुल पाखले यांनी बँक करित असलेल्या प्रगतीची सभासदांना दखल घ्यावी लागेल असे सांगुन त्यांनी सुध्दा सर्व संचालक मंडळाचे व बँकेच्या सर्व कर्मचारी वर्गाचे आभार मानले.

माननीय उपाध्यक्ष, श्री. दिलीप मथुरादास भोईर यांनी उपस्थित असलेल्या सर्व सभासदांचे आभार मानले व राष्ट्रगितानंतर माननीय अध्यक्षांच्या संमतीने सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

Chief Executive Officer

सही/-
अध्यक्ष